ज्ञानसेवा तु साफल्यम्

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## मराठी विभाग

## इयत्ता सहावी ते आठवी च्या विद्यार्थ्यांसाठी
## स्तराधारित अध्ययन कार्यक्रम (LBL) : २०१९-२०
## पूरक वाचन पाठ संच

सहकार्य : युनिसेफ व क्वेस्ट

# अनुक्रमणिका


| कार्ड क्र. | घटक | पाठाचे नाव |
|---|---|---|
| १ | १.१ | केक |
| | १.२ | झाका झाका! |
| २ | १.३ | पताका |
| | १.४ | नमाचे पेन |
| ३ | १.५ | मी आणि केतन |
| | २.१ | परी लपली |
| ४ | २.२ | बागेत चला! |
| | २.३ | नाकावरचे लोणी |
| ५ | २.४ | हरिदादा आणि कपिला |
| | ३.१ | कोण काय देते? |
| ६ | ३.२ | माशीने घेतला लाडू |
| | ३.३ | कोकमचे सरबत |
| ७ | ४.१ | झेंडावंदन |
| | ४.२ | रंगीबेरंगी पाने |
| ८ | ४.३ | मोगरा, गुलाब, चमेली |
| | ४.४ | मुंगी |
| ९ | ५.१ | गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द भर. |
| | ५.२ | वर्तमानपत्रातून शोध. |
| १० | ६.१ | आता हे वाच. |
| | ६.२ | आता हे वाच. |

| कार्ड क्र. | घटक | पाठाचे नाव |
|---|---|---|
| ११ | ६.३ | आता हे वाच. |
| | ६.४ | आता हे वाच. |
| १२ | ६.५ | शब्दांवरून वाक्य तयार कर. |
| | ७.१ | शब्दांवरून दोन वाक्ये तयार कर. |
| १३ | ७.२ | शब्दांवरून गोष्ट लिही. |
| | ७.३ | शब्दांवरून गोष्ट लिही. |
| १४ | ८.१ | मजकूर वाचून योग्य ठिकाणी पूर्णविराम व स्वल्पविराम दे. वाक्य पुन्हा लिही. |
| | ८.२ | मजकूर वाचून योग्य ठिकाणी पूर्णविराम व स्वल्पविराम दे. वाक्य पुन्हा लिही. |
| १५ | ९.१ | वाक्यांचा क्रम लाव. |
| | ९.२ | वाक्यांचा क्रम लाव. |
| १६ | ९.३ | वाक्यांचा क्रम लाव. |
| | ९.४ | वाक्यांचा क्रम लाव. |
| १७ | ९.५ | वाक्यांचा क्रम लाव. |
| | १०.१ | शब्दकोडे सोडव. |
| १८ | १०.२ | शब्दकोडे सोडव. |
| | १०.३ | शब्दकोडे सोडव. |
| १९ | १०.४ | शब्दकोडे सोडव. |
| | १०.५ | शब्दकोडे सोडव. |

# केक

नयन ये. केक काप.

मामा ये. केक घे.

## घटक १.१

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) केक कोणाला कापायला सांगितला ?

२) केक कोणाला घ्यायला सांगितला आहे ?

# झाका झाका!

मामा कान झाक.

काका हात झाक.

नाना पाय झाक.

नयन नाक झाक.

चेतन मान झाक.

# घटक १.२

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) मामाला काय झाकायला सांगितले?

२) हात कोणाला झाकायला सांगितले?

# पताका

मेघना ये. नयना ये.
केतन ये. चेतन ये.

मेघना, नयना पताका कापा.
केतन, चेतन पताका कापा.

नाना या. काका या.
या पताका पाहा.

## घटक १.३

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) पताका कोणी कोणी कापल्या?

२) पताका कोणाला दाखविल्या?

# नमाचे पेन

हे कमाचे पेन.
कमा ये. पेन घे.

ते नेहाचे पेन.
नेहा ये. ते पेन घे.

हे नमाचे पेन.
चेतन ये. नमाचे पेन घे.

# घटक १.४

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) नमाचे पेन कोणाला घ्यायला सांगितले? का?

२) सगळेजण पेन घेऊन काय करतील?

(या प्रश्नांचे वेगवेगळी उत्तरे येऊ शकतात.)

# मी आणि केतन

हा मी. हा केतन.

हे माझे नाक आणि हे केतनचे नाक.

हे माझे कान. हे केतनचे कान.

हे माझे हात आणि हे केतनचे हात.

हे माझे पाय. हे केतनचे पाय.

## घटक १.५

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

लक्षात ठेवायचे शब्द –

**‘मी’ ‘आणि’**

मजकूर वाचल्यावर मुलांना देण्याची कृती.

**“तू जे वाचलेस त्याचे चित्र काढ.”**

# परी लपली

परी दारामागे लपली.
आईने हाक मारली.
पण परी बाहेर आलीच नाही.

आईने चकलीची बरणी आणली.
बरणीत हात घालताच
परी नाचत बाहेर आली.

## घटक २.१

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) परी कोठे लपली?

२) परीला हाक मारताना आई काय म्हणाली असेल? ते कल्पना करून लिही.

३) परीला चकली आवडते हे मजकुरातील ज्या वाक्यावरून कळते ते वाक्य पुढे लिही.

# बागेत चला!

''आबा बागेत चला ना.''

''नाही मेघा, मला काम आहे.''

''चला ना आबा.''

''मीराला ने.''

''तिला पण काम आहे.''

''आईला ने.''

''नाही. तिला पण काम आहे.''

''बरं, चल.''

## घटक २.२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) बोलणे कोणा कोणात झाले?

२) आई आणि मीरा बागेत का येत नाहीत?

३) आबा बागेत यायला तयार झाले का?

# नाकावरचे लोणी

काल आईने दही लावले. आज तिने ताक केले. ताकावर लोणी आले. मनी ताकाजवळ जात होती. आईने मनीला पकडले आणि नाकाला लोणी लावले. मग कितीतरी वेळ ती नाकावरचे लोणी चाटत राहिली.

## घटक २.३

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) आईने काय बनविले?

२) मनीच्या नाकाला आईने लोणी का लावले असेल?

# हरिदादा आणि कपिला

हरिदादाला कपिला आवडते नी कपिलेला चारा. दादा आला रे आला की कपिला नाचायला लागते.

काल दादा आलेला पाहताच कपिला मान हलवायला लागली. घरी येताच दादा रानात गेला. रानातला हिरवा हिरवा चारा कापला आणि घरी आणला.

दादाने कपिलेला चारा घातला. पाणी दिले. आता कपिला खुश नी दादाही खुश.

## घटक २.४

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) कपिलेला काय आवडते ?

२) कपिला खुश नी दादाही खुश, असे का म्हटले आहे ?

# कोण काय देते ?

काळा ढग पाऊस देतो.

काळी माती पीक देते.

हिरवे झाड फळ देते.

गोदा गाय दूध देते.

## घटक ३.१

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) पाऊस कोण देतो ?

२) फळ व दूध कोण देते ?

३) पीक कोण देते ?

# माशीने घेतला लाडू

आज आईने लाडू केले. रमाला लाडू फार आवडतात. तिने दोन लाडू घेतले. दादाने तर तीन लाडू घेतले. दादाचा एक लाडू जमिनीवर पडला. दादाने तो उचलला. पण लाडवाचे बारीक कण जमिनीवर राहिलेच. मग एक माशी आली आणि तिनेही लाडू

## घटक ३.२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) लाडू कोणी केले?

२) रमाने एकाच वेळी दोन लाडू का घेतले असतील?

३) रमाच्या दादाला लाडू आवडत असतील का? कसे?

४) माशीने कोणता लाडू घेतला असेल?

# कोकमचे सरबत

काका काल कोकणातून आले. येताना कोकमचे सरबत आणले. लाल लाल दाट सरबताची बाटली मीनाला फारच आवडली. लगेच तिने चार कप पाणी घेतले. सरबत बनविले. आईला एक कप दिले आणि बाबाला एक कप दिले. दोघांनाही सरबत फारच आवडले. राहिलेले सगळे सरबत मीनाने घेतले कारण काकाला कोकमचे सरबत आवडतच नव्हते.

## घटक ३.३

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) सरबत कशाचे बनविले ?

२) काका कोठून आला ?

३) मीनाने किती कप सरबत बनविले ?

४) मीनाला किती कप सरबत प्यायला मिळाले ?

# झेंडावंदन

आज २६ जानेवारी. शाळेत
झेंडावंदन आहे. आठ वाजता
पाहुणे येतील. उंच काठीवर
तिरंगा फडकवतील. सगळे जण
एकच नारा देतील.
भारत माता की जय!
भारत माता की जय!

## घटक ४.१

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) पाहुणे किती वाजता येणार आहेत?

२) शाळेत कोणकोणत्या दिवशी झेंडावंदन असते?

# रंगीबेरंगी पाने

दरसाल झाडाला नवी पालवी येते. आधी ती लाल किंवा आमसुली रंगाची असते. मग हळूहळू पाने पोपटी, हिरवी, तपकिरी होऊ लागतात आणि गळून पडतात.

## घटक ४.२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) या उताऱ्यात आलेली रंगांची नावे शोधून लिही.

टीप – आमसूल म्हणजे कोकम या झाडाचे लालसर रंगाचे फळ. ते खूप आंबट असते. कोकणात आमसुलाचा उपयोग आमटी व भाजीत टाकण्यासाठी करतात.

# मोगरा, गुलाब, चमेली

मोगरा, गुलाब दारावर
चमेली गेली घरावर
मोगरा, चमेली नाजूक
गुलाबाला काटे खूप
जांभळी फुले कांचनची
पिवळी फुले झेंडूची
गुलाबी, जांभळी, पिवळी फुले,
अंगणात पाहून हसली मुले.

## घटक ४.३

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) या कवितेत कोणकोणत्या फुलांची नावे आली आहेत?

२) रंग आणि फुले यांच्या जोड्या लाव.

| | |
|---|---|
| मोगरा | जांभळा |
| कांचन | पिवळी |
| झेंडू | पांढरा |

# मुंगी

मुंगी केवढासा जीव. लहानसे डोके आणि लहानसेच धड. धडाला इवले इवले सहा पाय. ते तुरू तुरू पळायला फारच कामी येतात. मुंग्या सरळ रांगेत जातात. समोरून मुंगी आली तर एकमेकांशी काय बोलतात कोण जाणे?

## घटक ४.४

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न –**

१) तू मुंग्यांची रांग पाहिली आहेस का ? कोठे? मुंग्या काय करत होत्या ते सांग.

– मुलांनी सांगितलेले अनुभव शिक्षकाने फळ्यावर लिहून काढणे.

## गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द भर.

(वाटला, झाला, आहे, आली, केले, आणला, केला)

आज सचिनचा वाढदिवस ________ . सगळ्या मुलांनी पैसे गोळा ________ आणि केक ________. वाढदिवस शाळेमध्ये साजरा ________. सचिनने पण सगळ्या मुलांना खाऊ ________. वाढदिवस आनंदात साजरा ________ वाढदिवसाला

# घटक ५.१

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# वर्तमानपत्रातून शोध.

जशी आपण 'य' ची जोडाक्षरे शोधली, तशीच इतर जोडाक्षरेही असतात. ती तू वर्तमानपत्रातून शोध.

जसे – पुन्हा, म्हैस, सत्ता याप्रमाणे....

| | | |
|---|---|---|
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |



# घटक ५.२

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# आता हे वाच.

| | | |
|---|---|---|
| क्षमा | अक्षर | औषध |
| अंगठी | ठेंगणा | स्वादिष्ट |
| क्षितिज | ज्ञानेश्वर | क्षार |
| ज्ञानी | बक्षीस | अज्ञान |



## घटक ६.१

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# आता हे वाच.

| | | |
|---|---|---|
| विषारी | छान | वर्ष |
| छाती | कोष | छावणी |
| भाषा | छाप | वेष |
| छुमछुम | वार्षिक | छकुली |



## घटक ६.२

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# आता हे वाच.

| | |
|---|---|
| तुऱ्यावर | शेतकऱ्याला |
| उताऱ्याचे | तोऱ्यात |
| साताऱ्याहून | साऱ्याजणी |
| अधिकाऱ्याने | असणाऱ्या |

## घटक ६.३

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# आता हे वाच.

| | | |
|---|---|---|
| वर्ग | वर्तमान | सूर्य |
| वर्तुळ | पर्व | मूर्ख |
| गर्व | हर्ष | दूर्वा |
| वर्ष | पर्वत | मूर्ती |
| पूर्ण | कीर्तन | सुवर्णा |



## घटक ६.४

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दांवरून वाक्य तयार कर.

१. शिट्टी – ______________________

२. स्वस्त – ______________________

३. दप्तर – ______________________

४. पेन्सिल – ______________________

५. किल्ली – ______________________

## घटक ६.५

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## शब्दांवरून दोन वाक्ये तयार कर.

१. आजारी

२. भात

३. भाकरी

४. खोकला

५. बिस्किट



## घटक ७.१

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## शब्दांवरून गोष्ट लिही.

१. जांभळे, मुले, नदी, पाणी

२. जत्रा, पाळणा, गर्दी, आजोबा

३. बाग, मुले, फुलपाखरे, पेरू

४. विरू, विहीर, मासे, टोपली

## घटक ७.२

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दांवरून गोष्ट लिही.

१. डोंगर, झुडूप, ससे, पक्षी

२. गणू, मित्र, नदी, मासे

३. पाऊस, बेडूक, गवत, सरू

४. थंडी, विनू, शेकोटी, पाणी



## घटक ७.३

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## मजकूर वाचून योग्य ठिकाणी पूर्णविराम व स्वल्पविराम दे. वाक्य पुन्हा लिही.

१. राजेंद्र आत्याकडे राहायला गेला तो तिकडे आजारी पडला त्यामुळे त्याला आत्याने दवाखान्यात नेले

२. गणू दुकानावर गेला त्याने दुकानातून साखर आणून आईकडे दिली आईने चहा बनविला. चहा बाबांनी प्यायला

३. प्रांजळ अंगणवाडीत येते तिच्याबरोबर रणजीत तारा आणि विनय ही सर्व मुले मिळून येतात अंगणवाडीत आल्यावर आधी आपल्या डब्यातील खाऊ संपवितात



## घटक ८.१

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## मजकूर वाचून योग्य ठिकाणी पूर्णविराम व स्वल्पविराम दे. वाक्य पुन्हा लिही.

१. आई शेतात गेली तिने काकडी कारली माठ भाजी आणि गवार आणली

२. गुरुजींच्या बरोबर आनंद तनू महावीर आणि रेणू भिवंडीला गेले

३. बाबांनी साकीला बाजारातून केळी द्राक्ष आणि बिस्किटे आणून दिली

४. काल राधा शाळेत आली नाही कारण तिला ताप आला होता



## घटक ८.२

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# वाक्यांचा क्रम लाव.

- मुलांनी हात धुतले.
- ताईने मुलांना जेवायला सुट्टी दिली.
- सर्व मुले डबे घेऊन जेवायला बसली.
- सर्वांनी गप्पा मारत जेवण केले.



## घटक ९.१

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## वाक्यांचा क्रम लाव.

- आंबे धुतले.
- ताई बाजारात गेली.
- रस सर्वांना खायला दिला.
- आंब्याचा रस काढला.
- तिने आंबे आणले.

## घटक ९.२

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# वाक्यांचा क्रम लाव.

- त्याला वडापाव खूप तिखट लागला.
- तिने वडापाव आणला.
- काजल टपरीवर गेली.
- तो पाणी प्यायला घरात गेला.
- काजल ने वडापाव दादाला दिला.



## घटक ९.३

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# वाक्यांचा क्रम लाव.

- फिलीपने माशांना खायला टाकले.
- फिलीप तलावाजवळ गेला.
- मासे मटामटा खाऊ खात होते.
- त्याने तिथे मासे बघितले.
- हे बघून फिलीपला खूप मजा वाटत होती.

## घटक ९.४

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# वाक्यांचा क्रम लाव.

- त्याला रस्त्यावर मोठा साप दिसला.
- सायरस रस्त्याने शाळेत चालला होता.
- शेजारचे काका धावत आले.
- तेवढ्यात साप निघून गेला.
- तो मोठ्याने ओरडला.

## घटक ९.५

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दकोडे सोडव.




१. आई कपाळाला लावते.

२. याने लाकूड कापतात.

३. आपण पेनाने कशावर लिहितो.

४. एक पक्षी.

५. आपण पायात काय घालतो ?

# घटक १०.१

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दकोडे सोडव.




१. पाण्यात नाव (होडी) चालवतो.

२. उसळ करण्याचे एक धान्य.

३. दोन्ही हातांनी वाजवितो.

४. उपवासाला खिचडी बनवितात.

५. बायका सोन्याचे काय घालतात?

# घटक १०.२

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दकोडे सोडव.




१. खाताना याचा कुडुम कुडुम असा आवाज येतो.

२. एक फळ.

३. आपण आकाशात उडवितो.

४. उकळलेले पाणी कसे असते?

५. गावागावांना जोडतात आणि आपण त्यावरून चालत जातो.

# घटक १०.३

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दकोडे सोडव.




१. डॉक्टर हे देतात.

२. उंचावरून पडणारे पाणी.

३. पाण्यात पोहणारा पांढरा पक्षी.

४. एका फुलाचे नाव.

# घटक १०.४

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शब्दकोडे सोडव.




१. शेतकरी शेत कशाने नांगरतात.

२. पावसात हे सगळीकडे उगवते.

३. आई भाकरी कशावर भाजते ?

४. जंगलात डरकाळी फोडतो.

५. आपल्याला वेळ सांगते.

# घटक १०.५

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.